Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- IX | ISSUE- IV | APRIL | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# राष्ट्र राज्याची उत्पत्ती व उदय : एक विश्लेषण

**प्रा. डॉ. चंद्रशेखर शंकरराव ढोले**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

**प्रस्तावना :**

राष्ट्र राज्याची उत्पतती व उदय या बाबतीत अनेक राजकीय विचारवंतानी वेगवेगळे सिध्दांत मांडले आहेत. त्यात दैवी सिध्दांत, उत्क्रांतीवादी सिध्दांत असे अनेक सिध्दांत प्राचीन काळात मांडण्यात आले आहेत त्यात लॉक रूसो हब्ज यांनी माडंलेला सामाजिक करार सिध्दांत हा मान्यताप्राप्त झाला. या सिध्दांताच्या आधारे राज्याची निर्मिती सामाजिक करारातून झाली हे त्यांनी स्पष्ट केले. प्रस्तुत शोधनिबंधात राष्ट्र राज्याची उत्पत्ती व उदय : एक विश्लेषण या विषयाची मांडणी करण्यात आली आहे.

राज्याच्या उत्पत्तीसंबंधी शांतिपर्वात (धर्मराजा व भीष्मसंहार अध्याय ५९) विवेचन आहे. समाज निर्माण झाल्यानंतर दीर्घ काळपर्यंत सुखी व सुसंवादी जीवनाचे सुवर्णयुग होते. लोक स्वभावतः सद्गुणी असल्याने जीवन सुखी व स्वास्थ्यपूर्ण होते. समाजात शांती होती. या काळी कायद्यांचे पालन होते की नाही हे पाहण्यासाठी शासन नावाचा प्रकारच नव्हता. तरीही जीवन सुखी होते. राजा नव्हता, न्यायालयही नव्हते. नंतर नैतिक अधःपात झाला. लोकांनी सत्प्रवृत्ती सोडली; लोभ, स्वार्थ, मोह यांचा मनावर पगडा बसत्या. यामुळे समाजात जे सुख होते, शांती, समाधान नांदत होते ते नष्ट झाले आणि अशांती, हेवेदावे, द्वेष, स्पर्धा वगैरेंनी जीवन दुःखी झाले. न्याय संपुष्टात आला. बळी तो कान पिळी हे तत्त्व रूढ झाले. मात्स्यन्याय सुरू झाला. स्वर्गतुल्य सुखी जीवन नष्ट होऊन समाजात नरकाप्रमाणे यातना निर्माण झाल्या. देवांना या परिस्थितीची जाणीव होताच त्यांनाही वाईट वाटले. नंतर एक काही मंडळी देवांकडे गेले आणि या परिस्थितीतून आमची मुक्तता करा अशी त्यांनी देवांची प्रार्थना केली. देवाधिदेव ब्रह्मदेवाने विचार केला की, मानवी समाज व्यवस्थित टिकावयाचा असेल तर एक संविधान आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी एक राजा याची नितान्त आवश्यकता आहे. मग ब्रह्मदेवाने एक एक लाख अध्यायांचे सर्वसमावेशक राज्यघटना स्वतः तयार केले, एक मानसपुत्र विरजा तयार केला व त्याला राजा म्हणून नेमले. सर्व लोकांनी त्या राजाच्या आज्ञेत राहण्याचे मान्य केले. अशा तऱ्हेने राज्य व राजा यांची परमेश्वरानेच उत्पत्ती केली. दुसरा सिद्धान्त शांतिपर्वात दुसऱ्या ठिकाणी राज्याच्या उत्पत्तीबद्दल थोडा वेगळा उल्लेख आढळतो. लोकांना पृथ्वीवरील दीर्घकालीन अराजकाचा फार त्रास वाटू लागला. जंगलाचा न्याय त्यांच्या सहनशक्तीपलीकडे गेला. मग त्यांनी आपआपसांत एक करार केला. समाजहिताविरुद्ध गुन्हे करणारांना किंवा परस्त्रीगमन करणाऱ्यांना समाजातून हद्दपार करावे असे या करारानुसार ठरले. या कराराला सर्वांची मान्यता घेण्यात आली; पण त्या कराराची कठोर अंमलबजावणी करण्याकरिता राजा नसल्यामुळे, करार होऊनही परिस्थितीत काही फरक पडला नाही. शेवटी कंटाळून लोक ब्रह्मदेवाकडे गेले व त्यांनी आम्हांला राजा हवा अशी मागणी केली. हा राजा सर्वांना आदरणीय वाटेल असाही असला पाहिजे शिवाय त्याने सर्वांचे संरक्षणही करावे. ब्रह्मदेवाने: मनूला राजा म्हणून नेमले. मनूने प्रथम नकार दिला; कारण अशा लोकांवर राज्य करणे जमणार नाही असे त्याला वाटले. कराराचा सिद्धान्त पुढे चालविण्यासाठी येथे महाभारतकारांनी ब्रह्म देवाच्या संविधानाचा उल्लेख केलेला नाही. मनू राजपद स्वीकारत नव्हता तेव्हा लोकांनी त्याला जाऊन सांगितले की, आम्ही तुला कर वगैरे तर देऊच, शिवाय तुझ्या आशेतही राहू. आम्ही कायदे तोडले तर आम्हांला पाप लागेल, कायदेभंगाबद्दल तू आम्हांला शासन दिलेस तर त्याचे पाप तुला लागणार नाही. लोकांनी देवासमोर हे कबूल केल्यानंतर मनू राजपद स्वीकारण्यास तयार झाला. शांतिपवीत राज्याच्या उदयासंबंधी अशा तऱ्हेने दोन सिद्धान्त

आढळतात. एक परमेश्वर-निर्मिती आणि दुसरा करार-सिद्धान्त. अर्थात कराराच्या सिद्धान्ततही परमेश्वर आहेच. हे दोन्ही सिद्धान्त पाश्चिमात्य विचारवंतांच्या लिखाणातही आढळतात. हॉब्ज़, लॉक व रूसो यांनी सामाजिक कराराचा सिद्धान्त १८ व्या शतकापर्यंत मांडला व तो बऱ्याच लोकांना मान्य होता. विसाव्या शतकात अर्थातच आपण हे दोन्ही सिद्धान्त त्याज्य मानतो. वरील विवेचनात एक मनोरंजक गोष्ट आढळते. पूर्वी कधीतरी राज्य सरकार, कायदे, कोर्ट नव्हते व तरीही लोक सत्प्रवृत्त असल्याने सुखी होते ह्या कल्पनेत रमणारे विचारवंत पश्चिम व पूर्व या दोन्ही गोलार्धात आहेत हे सिद्ध होते. शांतिपर्वातील दोन्ही सिद्धान्तांचा विचार करून निष्कर्ष असा निघतो की, राज्य हे परमेश्वरनिर्मित आहे आणि राजाला परमेश्वराकडूनच अधिकार प्राप्त झाले आहेत. मात्र त्याने ते अधिकार पृथ्वीवरील अराजक नष्ट करण्यासाठी वापरावयाचे आहेत. राज्याचे क्षेत्र महाभारतात सभापर्वात राज्याच्या अधिकारक्षेत्राच्या बाबतीत उल्लेख आढळतो. त्यावरून राज्याचे क्षेत्र फार व्यापक होते असे लक्षात येते. सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक जीवनावर राज्याचे प्रभुत्व मान्य केले गेले होते. राज्य म्हणजे औषधाप्रमाणे अनिवार्य कटू अशी बाब नव्हती. त्याचप्रमाणे राज्याचे क्षेत्र कमीतकमी असावे असाही दृष्टिकोन नव्हता. राज्य केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरते आहे हा विचार लोकमान्य नव्हता, उलट संपूर्ण मानवी जीवन-पृथ्वीतलावरील व नंतरचेही व्यापून यकील असे राज्याचे क्षेत्र होते. समाजात सत्प्रवृत्ती, नैतिक आचर व दया निर्माण करणे हे राज्याचे काम समजले जाई. धर्म व पंथांना त्यांच्या विचारानुसार कार्य करण्यास सर्व सुविधा निर्माण करणे ही राज्याची जबाबदारी होती. समाजस्थिती सुधारणे, विविध विद्या व कलांना सक्रिय प्रोत्साहन देणे हे राज्याचे कर्तव्यच होते. यामुळे राजे लोक विद्वानांना व कलावन्तांना राजाश्रय देत असत आणि विद्यापीठांना धनसाह्य देत. धर्मराजाची विरक्ती शांतिपर्वातील राजधमीनुशासनपर्वाचा प्रारंभ करताना महाभारतीय युद्धामुळे व्यथित झालेला धर्म राज्य सोडून वनात निघून जाण्याचा विचार मांडतो. आप्तेष्टांची इतकी हत्या करून जे राज्य मिळाले ते त्याला त्याज्य वाटते. त्याच्या या विचारापासून त्याला परावृत्त करण्याचे काम चार पांडव व द्रौपदी, कृष्ण, निरनिराळे ऋषी करतात. ते त्याला विविध मार्गांनी राज्य टिकवून धरण्याची व त्यानेच राज्य स्वीकारण्याची आवश्यकता प्रतिपादन करतात. पुन्हा पुन्हा धर्म कळकळीने आपले म्हणणे मांडतो. ही सर्व चची एकूण चाळीस अध्याय आहे. चाळिसाव्या अध्यायात धर्म राज्याभिषेकाला तयार होतो. धर्माला समजावणे कुंतीने त्याला कर्णाची समग्र कथा सांगून त्याच्या मृत्यूचे दु:ख करू नकोस, राज्य स्वीकार असे सांगितले तेव्हा धर्माने तिला 'इतके दिवस ही गोष्ट गुप्त का ठेवलीस ! यापुढे कोणत्याही स्त्रीला कोणतीही गुप्त गोष्ट मनांत ठेवता येणार नाही' असा सर्व स्त्रियांना शाप दिला. अर्जुनाने त्याला धनाचे महत्त्व समजावून सांगितले. भीमाने आपल्या स्वभावानुसार कधी त्याची कानउघाडणी केली तर कधी राज्य स्वीकारण्यात गैर काहीच नाही असे सांगितले. राज्यप्राप्तीसाठी जे आडवे येतील त्यांना ठार मारणे हे क्षत्रियांचे कर्तव्यच आहे असे भीमाने सांगितले. तरीही धर्म आपला विचार सोडेना. एका अध्यायात कोणीतरी धर्माची समजूत घालण्याचा प्रयत्न, दुसऱ्या अध्यायात धर्माचा राज्य सोडण्याचा निर्णय, पुन्हा समजूत, पुन्हा तोच निर्णय अशी शांतिपर्वात प्रारंभी रचना आहे. अर्जुनाने गृहस्थधर्माचे महत्त्व विशद केले. नकुल-सहदेवांनीही आपल्या परीने प्रयत्न केले. नंतर द्रौपदीही पुढे सरसावली, द्वैतवनात आपण दुर्योधनाचा पराभव करून पुन्हा राज्य मिळवू असे वचन तुम्ही तुमच्या भावांना दिले होते, त्याचे स्मरण ठेवा असे द्रौपदी धर्माला बजावते. "जो मित्रा व नपुंसक आहे तो पृथ्वीचा उपभोग घेऊ शकत नाही. तो धनही मिळवू शकत नाही. धनाचा उपयोगही करू शकत नाही. फक्त चिखल असेल तर त्यात मासे नसतात त्याप्रमाणे अशा नपुंसकांच्या घरांत पुत्रही नसतात. ज्याच्याजवळ दण्ड नाही त्या क्षत्रियाला काही किंमत नाही, दण्डहीन राजाच्या प्रजेलाही सुख मिळत नाही. सगळ्यांशी स्नेह, दान घेणे, अध्ययन व तपस्या करणे हे ब्राह्मणाचे गुण आहेत, क्षत्रियाचे नव्हेत. दुष्टांना शासन करणे, सज्जनांचे रक्षण करणे आणि युद्धात कधीही पलायन न करणे हा क्षत्रियाचा धर्म आहे. शास्त्र प्रवचन ऐकून तुम्हांला ही पृथ्वी प्राप्त झालेली नाही, किंवा दानात प्राप्त झालेली नाही, किंवा कोणाला समजावून वाटाघाटी करून मिळालेली नाही, भीक मागूनही मिळालेली नाही. शत्रूच्या हत्ती, घोडे, रथ यांनी युक्त असलेल्या आणि द्रोण, कर्ण, अश्वत्थामा, कृपाचार्य वगैरे श्रेष्ठ सेनापती असलेल्या सैन्याचा तुम्ही पराक्रमाने वध करून ही पृथ्वी जिंकलेली आहे. तुम्ही पुरुषसिंह आहात,

VOL- IX ISSUE- IV APRIL 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

अनेक राजाधिराजांना तुम्ही जिंकले आहे, असे द्रौपदी धर्माला सागते.

**निष्कर्ष :-**

राज्यसंस्थेचा उदय सामाजिक करारातून झालेला आहे समाज व राजा यांच्यातील कराराचा परिणाम म्हणजे राज्यसंस्थेचा उदय. शांतीपर्वात भिष्माने धर्मराजाला जो उपदेश केला व राजधर्माचे पालन करण्यास सांगितले तोही संवाद राज्यसंस्थेच्रूा उदयास महत्वाचा आधार आहे. नंतरच्या काळात राजाच्या आदेशात वागण्याचे समाजाने मान्य केले.व राज्यसंस्थेने राजधर्माचे पालन करून लोकांची काळजी व संरक्षण करावे.

**संदर्भ :-**

१) सुधाकर कुलकर्णी, निवडक राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातूर

२) भास्कर भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापूरे ॲण्ड पब्लिशर्स नागपूर

३) www.theories of origin of state in asian india.